Publication: Tarun Bharat
Date: 3/6/2019
Page: 2
Column: 3-4

तरुण भारत संवाद • सोमवार दि. ३ जून २०१९ •

# अदानी इलेक्ट्रिसिटी ग्राहक सेवेसाठी १९१२२ क्रमांक

प्रतिनिधी
मुंबई

अदानी इलेक्ट्रिक मुंबई लिमिटेड (एईएमएल) या शहरातील सर्वात मोठ्या खाजगी विजकंपनीने ग्राहकसेवेसाठी १९१२२ हा एक्सक्लुझिव्ह क्रमांक ठेवला आहे. हा क्रमांक सोपा आणि लक्षात ठेवण्यास सोयीचा असेल अशा दृष्टीने ठेवण्यात आला आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशी बहुभाषिक सेवा या क्रमांकावर उपलब्ध असणार आहे. हा ग्राहकसेवा २४ तास आठवड्यातील सातही दिवस मुंबईतील सर्व विज ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहे.

ग्राहकांचे संस्थेशी संवाद साधण्याचे मार्ग सुलभ करुन एईएमएलने ग्राहकसेवा अनुभव मोठ्या प्रमाणात सुधारला आहे. नवीन ग्राहक सेवा क्रमांक कॉल करणाऱ्याला आयव्हिआरच्या मार्फत आठ सुलभ पर्याय दिले जातात. आग किंवा विजेचा धक्का बसत असल्यास, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे इमारतीतील लिफ्टच्या सुविधेत अडथळा निर्माण झाल्यास, उत्खनन किंवा विजचोरी झाल्यास अधिक तातडीचा आणि महत्त्वपूर्ण पर्याय असून या तक्रारींसाठी अग्रक्रम देण्यात आला आहे. यापूर्वीचा ग्राहकसेवा क्रमांक १८००२००३०३० होता हा क्रमांकही सध्या सुरू राहणार असून, कालांतराने तो बंद करण्यात येईल.